# प्रेषित पौलाने आपल्या पत्रांद्वारे नवीन विश्वासणाऱ्यांना बळ दिले

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू, पौलाने नवीन मंडळ्यांसाठी केलेल कार्य आणि त्यांना लिहिलेली पत्रे याची प्रशंसा करण्यास कृपा करून मुलांचे सहाय्य कर"

मुलांचे वय आणि गरजा ह्यांना अनुरुप असे शैक्षणिक कार्यक्रम निवडा, पौलाच्या पत्रांविषयी शिकविण्यासाठी त्याचे सर्वात छोटेखानी फिलेमोनाला पत्र वचून तयारी करा.

त्यात पुढील गोष्टी पाहा:

- पौल स्वत:ला काय म्हणतो [वचन 1]
- फिलेमोनला काय मिळावे अशी आशा पौल करतो [वचन 3]
- तो फिलेमोनसाठी काय करीत होता [वचने 4-6]
- पौलाने कोणाच्या वतीने फिलेमोनाकडे विनंती केली [वचने 10-14]
- फिलेमोनाने काय करावे अशी पौलाची इच्छा होती [वचने 15-18]



पौलाने फिलेमोनाला पत्र का लिहिले ते मुलांना सांगा, वरील प्रश्नांच्या उत्तरामध्ये तुम्हाला समजलेल्या गोष्टीवर प्रश्न विचारा.

पोलाने आपली काही पत्रे लिहिली तेव्हा तो तुरुंगात होता, असे का ते समजून सांगा,

- प्राचीन रोमच्या सम्राटांनी अनेक राष्ट्रांवर राज्य केले आणि ते अत्यंत अहंकारी होते, त्यांनी ख्रिस्ती लोकांना तुरुंगात टाकले आणि सम्राटांच्या प्रतिमांची उपासना करण्यास नकार देणाऱ्या अनेकांना जिवे मारले.
- प्रेषित पौलाने अनेक वर्षे रोमन तुरुंगात घालविली, तेथूनच त्याने नव्या मंडळ्यांना पत्र लिहून त्याद्वारे त्यांना बळ देण्याचे काम सुरू ठेविले.

नाट्यीकरण करा पौलाने पत्रातून लिहिलेल्या काही घटना तुम्ही सर्व भूमिका करण्याची आवश्यकता नाही.

- मुलांना ही नाटिका सादर करता यावी/यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांच्या तयारीत मदत करावी.

- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी निवेदक, खोटारडा, फिलेमोन आणि पौल ह्या भूमिका कराव्यात. पौलाकडे पवित्र शास्त्र व एक पोते द्या.
- लहान मुलांना दगड फेकणारे, तुरुंग अधिकारी, चोर आणि पत्र नेणारा अनेसिम ह्या भूमिका द्या,

**निवेदक:** "एखादा दास पवित्र शास्त्रातील एका पत्राविषयी काय लक्षात ठेवील ते ऐका."

**अनेसिम:** फिलेमोनापासून दूर खोलीच्या एका बाजूपासून दुसरीकडे पळा.

**फिलेमोन:** "मागे फिर अनेसिम! तू चोर अगदी कुचकामी दास आहेस!"

**निवेदक:** इतर कोठेतरी तो दास पौलाला भेटला आणि पौलाने त्याला येशूकडे आणून परत फलेमोनाकडे पाठविले.

**अनेसिम:** फिलेमोनाकडे जाऊन त्याला पत्र द्या.

**फिलेमोन:** "अनेसिम का! आलास का परत तू!" (वर नजर फिरवा) पौलाने हे पत्र लिहिले! तुला मी परत घ्यावे दास म्हणून नाही तर ख्रीस्ती बंधू म्हणून स्वीकारावे अशी पौलाची इच्छा आहे! होय! तू स्वतंत्र आहेस! आपण दोघे मिळून ख्रिस्ताची सेवा करू." (अनेसिमला अलिंगन द्या.)

**निवेदक:** "पौल तुरुंगवासात असतांना खोटे पुढारी/करिंथमध्ये शिरले. त्यांचा खोटेपणा ऐका!"

**खोटारडा:** "पौलाला प्रेषित म्हणवून घेण्याचा काही एक अधिकार नाही. पण मला आहे! मी खरा प्रेषित असून तुमच्या मंडळीचे पाळकपण करीन! आणि तुम्ही मला दान द्या."

**निवेदक:** "ही चूक सुधारण्यासाठी पौलाने करिंथकरांना पत्र लिहिले. त्याने काय लिहिले ने ऐका."

**पौल:** 2 करिंथ 11:13-14 ही वचने मोठ्या आवाजात वाचा.

**खोटाराडा:** "मी सैतानाचा सेवक आहे, परंतु विश्वासणाऱ्यांना फसविण्यासाठी मी आध्यात्मिक शब्द वापरले!" (विकट हास्य करा.)

**पौल:** वाचा 2 करिंथ 11:23-24

**तुरुंगाचा अधिकारी:** पौलाकडून पवित्र शास्त्र आणि पोते काढून घ्या. मग त्याला बांधून पाठीवर चाबकाचे फटके मारण्याचा अभिनय करा. तुम्ही पौलाला जाडजूड चाबकाने मारीत आहात असे समजून तुमचे हात हालवा. प्रत्येक वेळी तुम्ही हात उचलाल तेव्हा त्याला किती फटके मारले ते मोजा. सुरुवात 35 पासून करून 37 क्रमांकावर थांबा "पस्तीस!" (फटका) "छत्तीस!" (फटका) 39 पर्यंत असे करा.

**पौल:** पत्येक फटका मारल्यावर वेदनेने ओरडा. 39 व्या फटक्याला खाली पडा. क्षणभर तसेच पडा आणि मग उभे राहून पोते व पवित्रशास्त्र घेऊन 2 करिंथ 11:25.

**दगड मारणारे व खोटारडा:** पौलाचा मोठे मोठे दगड मारण्याचा अभिनय करा.

**पौल:** वेदनने कळवळून ओरडा आणि पुन्हा खाली पडा.

**निवेदक:** "पौलाने करिंथकरांना आणखी काय लिहिले ते ऐका."

**पौल:** उभे राहून 2 करिंथ 11:26 वचने वाचा.

**चोर:** हळूच, येऊन पौलाच्या मागे गुपचूप उभे राहा. मग मोठ्याने म्हणा "ते पोते घ्या।" (पौलाच्या डोक्यावर दंडुक्याने मारल्याचा अभिनय करा. खरा दंडुका घेऊ नका, पोते घेऊन पळून जा.)

**पौल:** चोरांनी हल्ला केल्यावर खाली पडा.

**निवेदक:** "पौलाच्या पत्रातून आणखी काही भाग ऐका."

**पौल:** उभे राहून 2 करिंथ 11:27-28 ही वचने वाचा.

**निवेदक किंवा मोठे मूलः** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढासमोर सादर केले असेल तर त्यांना मुलांनी आधीच उत्तरे दिलेले वरील प्रश्न विचारा. येशूची सुवार्ता राष्ट्रांमध्ये जाऊन सांगताना पौलाने कोणती संकट सोसली त्याविषयी सांगण्यास मुलांना व मोठ्या माणसांना सांगा.

चित्र काढा : हातात चाबूक घेलेला संतापलेला माणूस किंवा पुढील चित्राची नक्कल करा.

- मुलांनी आपली चित्रे पुढच्या उपासनेच्या वेळी प्रौढांना दाखवावीत.
- इतरांची सेवा करतांना प्रेमळ पत्र लिहिणाऱ्या पौलाला काय काय सहन करावे लागले. ते या चित्रावरून दिसते हे त्यांना स्पष्ट करून सांगू द्या.



**पाठ कराः** लहान मुलांनी 1 योहान 2:12 तर मोठ्या मुलांनी 1 योहान 2:12-14 ही वचने पाठ करावीत.

**कविताः** तीन मुलांनी 1 योजना 2:12,13 व 14 ह्यातील एकेकवचन पाठ करून म्हणावे.

मोठ्या मुलांनी पौल व त्याने लिहिलेली पत्रे याविषयी कविता किंवा गीत लिहावे.

**प्रार्थनाः** "हे आमच्या स्वर्गातील पित्या पवित्र शास्त्रातील अद्‌भुत पत्रांबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो. त्या द्वारे पवित्र आत्मा आम्हाला उत्तेजन देतो, सुधारणा करतो आणि बल देतो."

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net